# गोधड

वाहरू सोनाव

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2558



REFBK-0025324
REFBK-0025324

संदर्भ काव्य
२५५४
२५३२४
११७१८७

# गोधड

( कविता-संग्रह )

वाहरू सोनावणे

REFBK-0025324

REFBK-0025324

ग्रंथ संग्रहालय ठाणे
2554
दा. क्र. 25326
काव्य 915.00
शाखा

रविराज प्रकाशन

प्रकाशक :
रवि बेहेरे
रविराज प्रकाशन
४५८/२ सदाशिव पेठ,
टिळक रोड,
पुणे ४११०३०

प्रकाशन क्रमांक ५७

मुखपृष्ठ : डॉ. मोहन देशपांडे

□

मूल्य : पंधरा रुपये

□

पहिली आवृत्ती
फेब्रुवारी १९८७

□

© वाहरू सोनावणे
श्रमिक संघटना ( शहादा )
ता. शहादा, जि. धुळे

□

मुद्रक :
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४, बुधवार पेठ
पुणे ४११००२

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.

ज्यांनी जबरदस्त नेतृत्त्व देऊन–
आदिवासी श्रमिकांना आपल्या हक्कासाठी लढायला संघटित केले. श्रमिक लढत आहेत. चळवळ शहादा भागात श्रमिक संघटनेच्या रूपाने घाव घालीत धाव घेत आहे. अशा चळवळीत ज्यांनी मला ओढून घेतले त्या आदिवासी श्रमिकांचा नेता अंबरसिंग दादा यांच्या स्मृतीस अर्पण.

वेळप्रसंगी
माझा अंबरही
असाच उपाशी झोपत होता
अन्
ह्याच फाटक्या गोधडीतनं
वाढत गेला.
– जाताना गोधडी बदलायला
सांगून गेला
आमच्यासाठी.
आम्हाला दादा हृदय देऊन गेला
अन् नजरही........!

# मनोगत

मी काही साहित्याचा अभ्यासक नाही. मराठीमधील काही कवीच्या कविता मी वाचल्या असल्या तरी मराठी कवितेत असणाऱ्या विविध प्रवाहांचीही मला माहिती नाही, खरे तर काही वर्षांपूर्वी मी काही विचार – कवितारूपाने लिहिले तेव्हा त्याला कविता म्हणता येईल की नाही याचीही मला शंकाच वाटत होती. त्या कविता मी अशोक राजवाडे, डॉ. मोहन देशपांडे आणि माझ्या काही मित्रांना वाचून दाखवल्या. त्यांनी त्याचे बरेच कौतुक केले व मला आणखी कविता लिहायला प्रोत्साहन दिले.

त्यानंतर आता हा कविता-संग्रह मी मराठी साहित्याच्या महासागरात सोडत आहे. मान्यवर साहित्यिक, कवी आणि टीकाकार माझ्या या कविता–संग्रहाचे काय मूल्यमापन करायचे ते करतीलच. मी या कविता जेव्हा माझ्या आदिवासी शेतमजूर भावा–बहिणींना वाचून दाखवल्या तेव्हा त्यांनी त्यांच्या प्रतिक्रिया मला दिल्या आहेत. त्यातील एक प्रतिक्रिया कविता–संग्रह वाचकांच्या हाती देताना सांगणे मात्र मला आवश्यक वाटते.

एका खेड्यावर एका झोपडीच्या ओट्यावर असच १५-२० लोक जमून बसलो होतो. त्यात काही म्हाताऱ्या बाया पण होत्या. पण ह्या लोकांना कविता हा प्रकार नवीनच होता. कवितांचे रसग्रहण करण्याचा त्यांचा दृष्टिकोण लक्षात घेण्यासारखा आहे. मी कवितांची वही उघडली आणि माझ्या भिलोरी कविता वाचायला लागलो तर कविता वाचल्यावर त्या आदिवासी शेतमजुरांनी ‘ वाह वाह ’ केली नाही, तर ते स्वतःच खूप हसून पडले आणि पुनः कविता वाचायला सांगितले. मी पुनः तीच कविता वाचली. ते पुनः खूप हसले आणि शेवटी गंभीर होऊन म्हणाले, ‘ खरा स भाऊ, खरा स. आपू बी काय करसूत; आपना जीवनच तस्या स.’

– वाहरू सोनवणे

## अनुक्रम / मराठी कविता


| | |
|---|---|
| १) हिरवाळ जंगलात | ९ |
| २) संध्याकाळी रात्री | १० |
| ३) काटे | ११ |
| ४) घोर | १२ |
| ५) बाळ, जीवाला जप | १३ |
| ६) पहाड हलू लागला आहे | १४ |
| ७) गोधड !... | १५ |
| ८) आणि... | १६ |
| ९) मंथन | १७ |
| १०) जिवंत सावली | २१ |
| ११) कविते ! | २३ |
| १२) कोर्ट | २५ |
| १३) हांका जखमांच्या | २६ |
| १४) चार भिंतीच्या आत | २७ |
| १५) रक्ताचे पुतळे | २८ |
| १६) आई माझी भारतमाता | ३० |
| १७) स्त्री | ३१ |
| १८) देवदासी | ३२ |
| १९) पालमांडी वस्ती | ३३ |
| २०) कटाक्ष | ३४ |
| २१) जीवन कण्हत आहे | ३५ |
| २२) रोजगार हमीच्या रांगेत | ३६ |
| २३) अश्रू बाईचेच का ? | ३८ |
| २४) डाग | ३९ |
| २५) छत्री | ४१ |
| २६) घायल तस्वीर | ४३ |
| २७) – वर्तमान | ४४ |

२८) उपाशी झोपू नका ४५
२९) – रात्रं कुजबूजत आहे ४६
३०) स्टेज ४७
३१) बांध ४८
३२) असं किती दिवस ? ४९
३३) चंद्रावर जाणारी माणसं ५०
३४) पोकळ बुडबुडे कशाला ? ५२
३५) बामणांची शेंडी ५३
३६) जखमा ५४
३७) चळवळ म्हणजे – ५५
३८) मी आणि ती ५६

## आदिवासी भिलोरी कविता/मराठी अनुवाद

१) तव्वय ५८
२) चिलम ६०
३) खावटी ६२
४) दुःख ६४
५) चांद गिऱ्हन ६६
६) चड्डी ६८
७) बायतीन बाई ७०
८) कुंदानी पेढी ७२
९) गांडं मान्सस्नी गांडी बात ७४
१०) फुगेल जनावरं ७६
११) पोरेस्नी बादी ७८
१२) ढयडा ढयडोस्नी चिंता ८०
१३) सुकल्यानी भाकर ८४
१४) नेरब्याना संसार ८६
१५) मां, पहिली लढाई आपनीच ८८
१६) एक भिलोरी गाणं ९०

## आम्ही प्रकाशित केलेले इतर कविता-संग्रह

| | | |
|---|---|---|
| पक्ष्यांचे ठसे | सुधीर मोघे | दहा रुपये |
| लावण्यगीते | जगदीश खेबुडकर | पंधरा रुपये |
| मोरपिसारा | ग. वा. बेहेरे | दोन रुपये |
| रंगबहार | कवी संजीव | पंधरा रुपये |

## हिरवाळ जंगलात

हिरवाळ जंगलात
गळून पडलेल्या
सागाच्या पानासारख्या
फाटक्या, त्या झोपड्या !
जंगलातील जंगली माणसं
कंदमुळं खाणारी
पण ...
कंद नाहीत, मुळं नाहीत;
ती केव्हाच संपून गेलीत
अफाट भुकेच्या खपाट
पोटात.
हिरवाळ जंगलातील नागडी पोरं
आदिम साम्यवाद आणि गुलामगिरीचे
खेळ खेळत होती
मातीत
झोपडीसमोर !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५४
काव्य १०१८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## संध्या काळी रात्री

संध्या ... काळी ... रात्री ...
कुशीत तान्हं रि रि–
करतंय ...
एक सावली जातं फिरवतेय
पीठ अश्रूंचं
दळून संपतंय.

## काटे

अप्रत्यक्ष रूपाने
जीवनाला टोचणारे काटे
शांतपणे, टोचत राहतात, टोचत राहतात
शांतपणे !
हे सर्व कळते पण समजत नाही
वाटेवरच्या काट्यांना–
आम्ही बोचू लागतो, टोचू लागतो
तेव्हा ते
वाटेवरचे काटे आम्हाला
उघडपणे बोचू लागतात
टोचू लागतात
एरवी, गुलशन बहार !

## घोर

अश्रू पुसून
ढोरकी पोरं म्हणतील–
' हो वाहरूभाऊची घोर आहे '
आणि नव्या गोष्टींना
जोडून देतील जुन्या आठवणींनी
' मसानवटीला ' जिवंत करण्यासाठी
म्होरके होऊन
पण
विझताना त्यांच्या जिव्हाळ्याने
विझलो तर !
जिव्हाळा कण्हत आहे
शास्त्रावर नजर ठेवून
वास्तवात.

---

घोर = थडगे

## बाळ, जिवाला जप

घामाचा थेंब न् थेंब
रक्तानं फडफडत
निर्जीव, बेवारस होत असताना
चोळीला ठिगळे देत–
' बाळ, जिवाला जप ' म्हणत
मला किती दिवस
निष्प्राण करत राहशील, आई !
साडीच्या फटीतून
लाज झिरपत आहे आणि
घुटमळलेला माणूसपणा
ठिगळाठिगळात.

## पहाड हलू लागला आहे

त्या माणसांची माणुसकी
ज्यांनी सोलून खाल्ली आहे
ते अजून जिवंत आहेत
आणि...
माणुसकीच्या रक्तावर
तेवत आहेत
जातीयतेच्या ज्योती
पहाड हलू लागला आहे
त्यात दबलेला माणूस
माणुसकीचा !

## गोधड

माझी फाटकी गोधड
मळलेली
गोधडीतल्या गोधडीत
गुद्‌मरत राहिलो
आंबट वासाने नाक
खालीवर करून
कुशी बदलत राहिलो
गोधडीत नाक खुपसून
आंबट वास सोसत राहिलो
याच गोधडीत
पूर्वज विझत गेलेत
अश्रूंनी गोधड भिजत गेली
आणि
आंबट वास
आठवण देत राहिला
पूर्वज दुःखांची
आजच्या वारसदारांना.
माझी फाटकी गोधड
मळलेली !

## आणि . . .

उसाचा रस पिणारी माणसं
आणि
माणसांचे रस पिणारे उस...

## मंथन

१९७७ मुंबई.
' मंथन ' चांगला आहे म्हणे
इतर सिनेमांपेक्षा !

काही मंडळी आणि....
काही मंडळी–
एकदम दचकली, कान टवकारले.
चला हो चला
घाई आणि गर्दी
तर काही सावकाश.
काहींनी उद्यापरवावर सोडले
तर काही बघू... म्हणाले !
घड्याळावर नजर फिरवून
काही बेचैन झाले
कुठल्या बसने टॉकीज गाठायची
चौकशी आणि धावपळ.
काहींना वेळ आणि स्थळ
काहीच माहीत नाही
ऐकीव माहिती आणि
पेपर पेपर ओरडतात
थोडा का होईना पण उशीर झालाच.

काही मंडळी आणि ...
काही मंडळी–
बघतच राहिली.
रेल्वेने जाऊ या ?
नको बाबा रेल्वे रुळावरून घसरतात–
धोका वाटतो.

मग टॅक्सीने जाऊ या ?
नको नको पैसे जास्त पडतात
मग पायीच जाऊ या ?

काही मंडळी आणि ...
काही मंडळी–
नजर बारीक करतात,
कोणी म्हणतो ह्या मार्गाने
कोणी म्हणतो त्या मार्गाने
कोणी म्हणतो कोणत्याही मार्गाने
जाऊ चुकत माकत
सर्वांना तिथंच जायचं आहे म्हणे !

काही मंडळी आणि ...
काही मंडळी–
स्मित करतात.
ह्या मार्गांनी
त्या मार्गांनी
मार्गावर मार्ग
मार्ग काढीत जात आहेत
इकडून तिकडून

: भल्या माणसा मला माहीत नाही–
अरे, बस बरोबर तिथंच जाते ना ?
: अरे, गप्प बैस; सांगतो तर !
: कुठं उतरायचं माहीत आहे ना ?
नाही तर विचारून घे
इथे लाज शरम कसली,
कधीकधी कंडक्टर पण चुकतात
कोलंबसची वाट चुकली होती म्हणे !

: मुंबईत मला सात वर्ष झालीत
कळलं ना ?
: होय पण ...
एकटं जायला भीती वाटते म्हणे,
लोक म्हणतात
किंवा तसे जाणे बरोबर नाही
परिस्थिती पाहून योग्य
निर्णय घ्यायला पाहिजे
चोरफासे, खिसेकापे असतात वाटेत
मुंबई आहे ना ! सांगता येत नाही
कोणाचे काय होते ते.

काही मंडळी आणि...
काही मंडळी–
खद्‌खदली मनापासून.
...म्हणून
डावे–उजवे, पूरब–पश्चिम सर्व मिसळून
जातात संगतीने पण...
विपरित गटागटाने
कोणी जातो–
धोरण, डावपेच, दोस्ती म्हणून तर
कोणी समजत नाही म्हणून
एकदुसऱ्याच्या गळ्यात हात टाकतात
काही सावधगिरीने
काही भोळेपणाने
काही फसव्या मनाने
काही नजर फिरवतात आणि
बघतात शास्त्रीय दृष्टिकोनातून
गंभीर, चिंतामग्न, भयभीत, तर

काही मोकळ्या मनाने
हसत खिदळत
जात असतात घाईघाईने
धावत्या वाहनातून आणि गच्च गर्दीतून
वाहनाने तर काही पायीच

मंथन सिनेमा पाहायला.

## जिवंत सावली

कष्टाला सावली नाही
असा पुरुष,
तो फक्त पुरुष
राबराब राबणारा
भुकेला जीव.
अंधारात चांदसूर्य
दिसत नाही मग
माणुसकीची जीवन सावली ती कुठून !
कष्टाला फळ नाही
उरलेले जीवन
दुसऱ्याला
सावली बनून जगतेय शरीर !

स्त्री : पुरुषाची सावली
जाते मागे मागे
पावलावर पाऊल टाकत.
माणुसकीचं स्वतंत्र अस्तित्व
नाकारलेलं व्यवस्थेनं;
तेव्हापासून डुबक्या खात
ती वाहात आली आहे
गुलामगिरीच्या पुरात
इथपर्यंत,
आता पुढे वाहात जाण्याची
डुबक्या खाण्याची
तिची तयारी नाही.

ज्या पुरुषी कष्टाला सावली नाही
आणि
स्त्री–पुरुषाची सावली
ह्या दोघांना माणूसपणाची सावली नाही.
घाम गाळूनसुद्धा.

राबून झगडून
व्हिएतनामागत उगवेल
तो सूर्य, आणि
किरणं पडतील पुरुषावर नि
पुरुषाला मिळेल सावली,
पण तीच किरणं
पावलावर पाऊल टाकत जाणाऱ्या
सावलीवर पडली तर ?
सावलीला काय मिळेल
माणूसपणा की मरण ?

सावलीला माणूस बनवण्यासाठी
माणसाजवळ आहे का माणूसपण
थोडंसं...
ती एक जिवंत सावली !

## कविते !

कविते, तू आलीस !
जीवनाला कंटाळून ?
तू कोण, तुझे जीवन–
तुलाच माहित
काल आलीस, आज आलीस
घडीघडी येऊ नकोस.
भेटण्याचा रस जाईल
तो रंग जाईल.
यावे म्हणून येत राहशील
जावे म्हणून जात राहशील
फायदा नाही.
कविते ! तुला अजून सांगतो
गरज असेल तेव्हाच ये.
जा. तू जा. रागवू नकोस.
रागावलीस तर रागव
तुलाच का हक्क नाही ?
पण लक्षात ठेव
रागवून चांगलं निघत असेल
तर रागव
उगीच रुबाब
दाखवायचा नाही
लोक हसतील.

कंटाळवाण्या जीवनाला
कापण्याची शक्ती
तुझ्यात आहे;
शक्तीला धार नसेल तर
उपयोग काय ?

भलत्या वेळी येऊ नकोस.
कविते ! जा. परत जा.
रडून चालणार नाही
अश्रू पुस
परत जा.
रडणं बघून दया करीन
ही तुझी भूल आहे
परिस्थिती बघून येत जा

तू मतलबी नाहीस ना ?
शंका वाटायला लागली आहे.
बघ, विचार कर
खरंच कविते, तू माझी आहेस ना ?
चुकलो तर माफ करू नकोस.
मग, उभी का आहेस ?
माझ्यावर तुझा विश्वास नाही ?
बहुतेक माझी राहिलेली नसशील.

कविते, माझी असशील तर
जा परत. थांबू नकोस.
भरोसा असू दे
मी विसरणार नाही
दगा देणार नाही....!

## कोर्ट

दरवाजा खुला साक्षीला नि
खिडक्या बंद करून येतो
चोरटा आवाज खिदळण्याचा.
' देवाची शपथ
खोटं बोलणार नाही '
म्हणत म्हणत सुटून गेले
अनेक गुन्हेगार
याच कोर्टातून
निर्दोष होऊन.
आणि–
कायद्याचे मायबाप
तुटलेल्या धाग्यांना
गाठ मारून
जाळे विणतात
कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे
जीव-जंतू दुर्बलांना अडकवण्यासाठी !
पण, कायदा म्हणतो–
' मी सर्वांसाठी !'
दुर्बल जीव
मोजत नाही
कायद्याची लंबाई.
न्यायमूर्तीचे हृदय
चौकटीत.

## हाका जखमांच्या

सत्तेच्या हिरव्या पानाखाली
झोपा घेणारे बगळे
झोपेशी भांडत आहेत
आणि त्यांच्या पाठिंब्यावर
लचके तोडणाऱ्यांना-
धडकी भरली आहे.
' त्या '–
हिरव्या पानाचा रस
जखमांना
बरे करू शकला नाही,
आश्वासनाच्या
फुगलेल्या फोडामधून
रक्त पू वाहून निघत आहे
हाका जखमांच्या.

## चार भिंतींच्या आत

चार भिंतीच्या आत-
संडास, बाथरूम, चूल
पलंग, पंखा, नळ आणि सर्वच आहे
वाजवली बेल दरवाजा उघडून
रेशन येतं आणि सर्व सर्व काही
कोणाशी काय देणंघेणं
आपलं काळीज पोटात सुरक्षित आहे ना ?
मग, झाले तर !
जगातली खबरबात
मनोरंजनासाठी-
पेपर, रेडिओ, टी. व्ही., फोन आहेच
अधूनमधून पत्र
जात येत राहतात चार भिंतींच्या आत
मोर्चा गेला भिंतीजवळून
तरीही भिंती तशाच
खिडकी उघडून मोर्चावाल्यांची
गंमत पाहिली : लाठी चार्ज
दुसऱ्या दिवशी : नळ बंद
भिंती थरारल्या आपसात.

## रक्ताचे पुतळे

उंच असेल माझी इमारत
त्या इमारतीपेक्षा !
हिंडायला टूरिंग
सुंदर बगिचा
थाटात राहू, मानाने जगू
चैनही चैन करू, त्यांच्यापेक्षा !!
स्वप्न बघतो मी
मनातल्या मनात ...
पण....
साक्षात असते झोपडी !
नि फाटक्या चिंध्या
थंड राखेची चूल
दारिद्र्यात लुकलुकणारे
ते फाटके जीवन
दगडालाही संतापवेल
असा तो बलात्कार
दु:खालाही बोचेल अशी–
ती दु:ख सहणारी माणसं
होश उडतो ...
खूप संताप, चीड येते
की मान मुरगळून टाकू
उलथून देऊ, पालथून देऊ
यों करू, त्यों करू
घाम फुटतो
तरीही –
मनाचे भित्रेपण तसेच
आणि पावलं मागे हटतात

धडकणे शांत होते
काही औलाद असेही असतात
तेव्हा ...
रक्ताचे पुतळे
चालायला लागतात
बोलायला लागतात !

## माझी आई भारतमाता

आई माझी भारतमाता
झोपली असेल कुणाकुणाच्या कुशीत
राजीखुषीने, यंत्रासारखी
कुणाचे सुख, कुणाचे दुःख
रात्र कुणाची, हुंदके कुणाचे
कुणाची सावली बनली
कुणाची बाहुली आणि कुणाची रातराणी
पदराचा डाग लपवत जगते भारतमाता
मातेला गर्भ लपवता येत नाही
अश्रूंना गर्भ राहील.
गर्भातून लढा जन्मला नाही तर
भारतमातेचा झेंडा
युगे न् युगे
असाच फडकत राहील
फडकत राहील असाच
आई माझी भारतमाता !

## स्त्री

तरुणपणी किजबीण
म्हातारपणी चेटकीण
असेही लोक म्हणतात
लोकांचे काय
लोक काहीही म्हणतात

□

एक वस्तू अशी
तिला वाटेत, घाटेत
सापडेल तिथं रोखावं
मनात आलं तर मिठीत घ्यावं
हौस फिटली तर सोडून द्यावं
हाक नाही, बोंब नाही

□

नवी साडी, नवी सून
सासऱ्याच्या पाया पडते
जुनी होऊन फाटते
साडीच्या संगेसंगे
आणि मग –
ठिगळे लावून लावून जगणे
जिंदगीभर !

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५४
काव्य २५३२४

---

किजबीण = वेश्या

## देवदासी

एक मुलुख
तिथं देवाच्या नावावर मुली सोडतात
कोंबड्याबकऱ्यागत.
तरुण होता होता
बगलेत घ्यावे
कानाकोपऱ्यात जाऊन
वापरून घ्यावे, कोण पाहतो
घर नाही, दार नाही
देवाच्या बकऱ्या त्या
देवदासी म्हणतात त्यांना,

## पालमांडी वस्ती

एक वस्ती
तिथं पाल मांडतात
पोटासाठी पोट आलं
तरीही त्यांना
पाल मांडावंच लागतं
पालमांडी वस्ती ती.

## कटाक्ष

पोट भरून खा बरं
अश्रू ? अश्रुचं काय
हे तर रोजच वाहत राहतात
तुम्ही जेवा पोट भरून...
...आणि त्या आईच्या कुशीतून
पोरानं कटाक्ष मारला
माझ्या पहिल्या घासावर

## जीवन कण्हत होतं

कालचा दिवस
हुंदके देत गेला
आजचाही जाईल,
विचार करत
ती बसली होती
आपल्याच कुशीत.
दारात जाऊन
उभा राहिलो
मी बोझा झालो त्यांना.
पोखरून गेलेले जीवन त्यांचे
पोखरून गेलेल्या जीवनावर
हलक्या पावलांनी
चालावे कसे ?
...जीवन कण्हत होते.

## रोजगार हमीच्या रांगेत

थकलेलं शरीर वाकलेलं
टिकाव जमिनीत
उचलून पुन: जमिनीत
अनेक टिकाव धुंद होऊन
वाकत होते
खोदत होते खड्डे
जोरजोराने.

शक्ती झिरपून पाणी–पाणी
कोरडा पडत जाणाऱ्या घशाला
ओलावा देण्यासाठी
कंबर सरळ करत
तो उभा राहिला !
फिरेल तिकडे
नजर फिरवली
आडोशाला, झाडाखाली
ट्याँ ट्याँ करणारी पिल्लं
थकून झोपलेली.
रेडियो ऐकत बसला होता
कारकून झाडाखाली–
सावलीत.

"चंदनसा बदन, चंचलसी चितवन
धीरे से तेरा ये मुस्काना ..."
गाण्याची धुन ऐकून –
ढेकळे घायाळ झाली
आणखीन.

मनाची झाली माती–माती
मातीचो घमेली डोक्यावर
चढवून देताना –
कॅमेरा फिरावा तशी
त्याची नजर फिरून गेली
तिच्या चेहऱ्यावरून
आणि
त्यांनी स्मित केलं
शुद्धीवर आल्यावर ... आणि
टक लावून पाहत राहिला।
घामेजलेलं शरीर नि
तिच्या जड पावलांकडे
रोजगार हमीच्या रांगेत
मिसळून जाईपर्यंत
....चंदनसा बदन चंचलसी चुभन
धीरे से तेरा ये मुस्काना ...

## अश्रू बाईचेच का ?

लग्नाच्या मंडपात, उभी राहून ती मुसमुसली
मनातली बात मनातच राहून गेली
पदराला गाठ मारून
लेकीच्या डोक्यावरून हात फिरवले
ती बोललीच नाही, बापापुढे
अन् मायलेकी हुंदक्याने भिजून गेल्या मिठीत.
पण हे मला उमगले नाही–
अश्रू आईचेच का निघतात
बाईचेच का निघतात....?

## डाग

सूर्य दमून, हळूच मावळून गेला
' त्या तिथं झोपडया होत्या ना ?
कुठं गेल्या ?
उतार गटारात सडकं पाणी वाहून
खड्डयात तुंबावं तसं –
त्या ठिकाणी अंधार जमलेला-तुंबलेला
उंच गेलेल्या इमारतींना उजेड देणाऱ्या
त्या दिव्यांची मी तुलना करत होतो–
आकाशात चमकणाऱ्या ताऱ्यांशी.
अन् तुलना करायला आकाशात
काय आहे त्या झोपडयांसाठी !
मी आकाशाकडे पाहात होतो.
घिरट्या घालणारी घार
तरंगत तरंगत खाली उतरावी
तशी माझी नजर खाली उतरते
त्या पसाऱ्यावर जाऊन हळूच थांबते, बसते.
झोपडयावर पसरलेला अंधार पाहून
मनात चंद्राची आठवण चमकून जाते,
' ह्या ' अंधाराची चंद्राच्या 'त्या' डागाशी
तुलना करता आली असती.

तो चंद्र ह्याच धरती चा
तुकडा आहे, म्हणे !
पण, तो धरतीपासून वेगळा का झाला ?
ते काहीही असो;
तो आकाशातही –
आपली माती दाखवत आहे की, नाही ?

इमानी चंद्र ;
नेहमी डाग लपवत चमकत असतो, असाच
त्या चंद्रावर माणसं गेली होती
उतरली होती म्हणतात
का ?
तो डाग पुसण्यासाठी ?
अंधारात, रात्रीच्या वेळी
पृथ्वी पण अंगठीच्या खड्यासारखी
लखलखत असते, म्हणे !
तेव्हा ... त्या झोपड्यांवर
तुंबलेला अंधार
चंद्रावरून, चंद्राच्या डागासारखाच
दिसत असेल ना ?

## छत्री

पाऊस धारा, सुसाट वारा
पावसात सापडलेली माणसं
धावताहेत गर्दीतून, वाट काढताहेत
डोकं खुपसायला–
जागा पाहताहेत.
बाजारातली ती गर्दी हलते
छत्र्या फटाफटा उघडल्या जातात.
काही–
एकाच छत्रीत गर्दी करतात
त्यांची आपसात ओळख असते
बिनओळखीला जागा नाही –
त्यानं जावं कुठंही...
छत्रीतली काही गर्दी
पुढे काही अंतरावर फाकते
तिथून त्यांचा मार्ग वेगळा, म्हणे !
काही आपण भले
आपली छत्री भली
तर काही आपल्याच छत्रीत
आपणच भिजत होते
आणि जो .. तो
आपल्या छत्रीबद्दल
अभिमान बाळगून होता.
माझी छत्री बारा सळ्यांची
त्यांची तर आठच
माझी छत्री लाल रंगाची
त्यांची काळ्या रंगाची
तर कोणी –

माझी छत्री मस्त
रंगारंगांची, पट्ट्यापट्ट्यांची
आणि मजबूत दांड्याची
आणि ... ...
'दहिने मुड, बाये मुड
तेज चल, पिछे मुड
प्लाटूनऽऽऽ थांब !'
पांडू हवालदार सिनेमाच्या
स्टोरीतली परेड
रेडिओवर सुरू होती
आणि पाखरं पावसात
मान आखडून
कडाकडा दात वाजवत
भिजून चिंब उभी
स्वत:च्याच आडोशाला.
... नुकताच पाऊस येऊन गेला
जमीन ओलीच आहे,
पावसाचे पाणी अजून वाहत आहे.
ढग आकाशभर पसरलेले

## घायल तस्वीर

आम्ही हिमालयात गेलो; अनेक नजरा बरोबर
मधमाशांच्या पोळ्यागत
पहाडाच्या धापाला लटकलेले
एक खेडेगाव.

तिच्याकडे बघून फोटोग्राफरचा डोळा चमकून गेला
“ हँस, बहनजी, हँस ... थोडी हँस ”
कॅमेऱ्याने नजर भिडवून तिला हसण्याचा आग्रह केला.

ती अशी घायल, की, बोललीच नाही
क्षणाच्या आधारावर
जन्मभरच्या दुःखाला धक्का देऊन
ओठावर मुस्कान आणू शकली नाही.

तांबडं फुटल्यासारखं जन्माला आलेल्या
आपल्या इवल्याशा जिवाला घेऊन
हिमालयाच्या कुशीत;
लपत चाललेल्या सूर्याच्या
पहिल्या किरणांची
उब घेण्यासाठी बसली होती दाराशी.
गरिबीचा पहारा भोवती
अन् दास्यत्वाच्या गारव्यात
गारठत.

‘ घायल की गत घायल ही जाने,
और न जाने कोई !’ म्हणत
माझी नजर
क्लिक.

## वर्तमान

झिजून–झिजून तो
' टी बी – टी बो ' खोकत होता
आकाशाकडे पहात होता
जणू काय धरतीवर त्याचं कुणीच नाही.
दम भरलेला
जोरजोरात श्वास घेत
हिंमत एकवटत होता
आणि पुढचे भविष्य रेखाटताना
रक्ताचे बेडके ओकत होता नि–
'वर्तमान' फुफ्फुसाला
ठिगळे जोडत होता.

## उपाशी झोपू नका

तेल संपून वात कोरडी पडत गेलेली
चिमणीची ज्योत अंधुक अंधुक
मुलं पार झोपलेली,
पडली आहेत.
रात्र उलटून गेलेली.
दोघांना झोप नाही.
बोलतही नाहीत
नुस्तीच बसली आहेत.
पोरांची आतडी टरारतात
मुलांना उठवतात;
' उठा, तुमच्या आईवडलांकडून
भाकर मागा. उपाशी झोपू नका.'

## रात्र कुजबुजत आहे

डोक्यापर्यंत ओढून झोपावं
आतल्या आत गुदमरायला होतं.
तोंड उघडावं तर मच्छर चावतात
कोण मुलखाची
ही अंधारी चावरी रात्र
आणि –
जेव्हा स्वप्नांवर बंदी येते
तेव्हा झोप लागत नाही.
रात्र कुजबुजत आहे
वेगळ्या संशयाने.

# स्टेज

आम्ही स्टेजवर गेलोच नाही
आणि आम्हाला बोलावलंही नाही.
बोटाच्या इशाऱ्यांनी –
आमची पायरी आम्हाला दाखवून दिली.
आम्ही तिथेच बसलो;
आम्हाला शाबासकी मिळाली.
आणि ' ते ' स्टेजवर उभे राहून–
आमचे दुःख आम्हालाच सांगत राहिले.
' आमचे दुःख आमचेच राहिले
कधीच त्यांचे झाले नाही...'
आमची शंका आम्ही कुजबुजलो.
ते कान टवकारून ऐकत राहिले
नि सुस्कारा सोडला
आणि आमचेच कान धरून
आम्हालाच दम भरला
माफी मागा; नाही तर....!

# बांध

गारव्याची गार थंडी ?
दादा, थंडी काय लागेल आम्हाला
आम्ही गरीब माणसं.
पोटाची आग इतकी आहे की
थंडी लागत नाही.
दादा, बांधावर वस्ती आमची.
तिथंच सूर्य उगवतो, तिथंच अस्त होतो.
बांधावरचा खुट्टा मी
खूट-जागल्या म्हणतात मला
काऽऽय सांगू दादा, 'बांधाचं बंधन'
फाऽऽर मोठं आहे ... फार मोठं !
केव्हातरी हा बांध
खोदून काढावा लागेल, फेकावा लागेल,
म्हणत म्हातारा हळूच उठला नि –
बांध धरून तो निघून गेला.

## असं किती दिवस ?

ओलं दुःख ओलं हिरवंगार
दुःखाच्या हिरवळीत बसून
सुखाचं स्वप्न फुलवत
अंधारातून चांदणं बघावं आणि
रोजचं दुःख रोज विसरत जावं–
उद्याचं दुःख भोगण्यासाठी!
पण, असं किती दिवस ?
जेव्हा चांदण्याच लपतात
ढगांच्या ढिगाऱ्यात
तेव्हा, वीज चमकते
दुःखाच्या हिरव्या वनात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य

## चंद्रावर जाणारी माणसं

काही मुलं कडेवर काही बोट धरून
डोक्यावर बि-हाड घेऊन
उदास चेहरे, भकास होऊन;
वाटेला लागलेत.
वाटेत एक दगड भेटला
त्याला गंमतच वाटली
मस्करीच्या सुरात त्यानं विचारलं
काय मंडळी कुठं निघालात ?
'चंद्रावर' मंडळीनं उत्तर दिलं.
चंद्रावर ? आणि तुम्ही ?
दगडाला खुप हसू आलं.
हसू आवरून दगडाने पुन: प्रश्न केला
– का ?
इथंही राहून काय करू ?
इथं आम्हाला थारा नाही
पोटात चारा नाही
काम नाही, धंदा नाही
काम मागायला गेलो तर
आमच्यावर लाठीहल्ला
आमचा विश्वास घायळ झाला
ठणक ओलीच
तोच कालची दुर्घटना घडून गेली
आम्ही स्वप्न तर पाहत नाही ना ?
अशी शंका येण्याअगोदरच
आमच्या झोपड्या
आमच्या डोळ्यादेखत
उध्वस्त केल्या .... आणि

तेव्हा एकच खळबळ उडाली, पण
नंतर तीही शांत झाली
युद्ध संपल्यावर
प्रेतावर चालावं तशा
उध्वस्त वस्तीत
खांद्यावर बंदुका पहारे देऊ लागल्या
लहान मुलांचे हुंदके
चिडीचूप
घाअश्रू बरले
गालावरचे अश्रू गालावरच आटून गले

झोपड्यांची वस्ती त्यांना
उकिरडा वाटला
गरीबांचा आसरा त्यांना
रोग पसरवण्याचे केंद्र वाटला
आमची मुलं त्यांच्या
रहदारीला अडथळा वाटली नि
एक सुसाट हुकुम सुटला नि
एक एक झोपडी विस्कटून टाकली
झोपडीचा कंदिल विझून गेला
पावला पावलावर अंधकार पसरला
लेकरुबाळांचे अश्रू झेलायला
अंगणही राहिले नाही
– आता तुम्हीच सांगा
आमचे कोण आहे ... या धरतीवर !
कोणीऽऽच नाही.
लोक चंद्रावर जातात आपणही जाऊ चंद्रावर
माणसाला माणुसकी मिळाली तर गंज !

## पोकळ बुडबुडे कशाला

जाऊ जाऊ म्हणता;
जावा, खुशाल जावा
तुम्हाला नाही पर्वा
मग, पोकळ बुडबुडे कशाला?

मन रमत नाही, सांगू नका;
नको ते बहाणे करू नका
बंधन वाटते तिथं राहू नका
जिथं जायचे तिथं जावा

दिशा देण्याची बात करता;
द्या दिशा
ठिगळे जोडत बसू नका
मुळात घाव घाला.

आगीत चालत जावं लागेल;
चालत जावा
सूं सूं गोळ्या सुटल्या तरी
रक्ताचा झेंडा फडकावत जावा.

## बामणांची शेंडी

सात पिढ्यांची पापं
बामणं धुवून काढतात
पण
जेवणात तूप मिळाले नाही तर
बामणांची शेंडी खाजते, म्हणे !

## जखमा

जखमांनी जगतोय मी
जखमाच जगवतात मला
माणुसकीची वाटचाल
जखमाच दाखवतात मला.

## चळवळ म्हणजे

चळवळ म्हणजे काही
दोन पाच दिवसांची जत्रा नव्हे;
की नदीला आलेला पूर नव्हे !
चळवळ म्हणजे माणुसकीचा गाभा
सतत विकसित होत जाणारा प्रवाह

प्रवाह तो –
मातीच्या कणा-कणातून पाझरतो
लहान मोठ्या झऱ्यांना
जोडतो. सामावून घेतो.

हा तो प्रवाह जो थांबत नाही
दगडं टाकून
अडवले, अडत नाही.
वळणे घेत
खडक चट्टाने फोडत
असमानतेतून वाट काढत
समतोल महासागराकडे
गतिमान होत असतो

अरे, भल्या माणसा–
तेवढाच त्याला ध्यास असतो;
तेवढाच त्याला ध्यास असतो !

## मी आणि ती

तिच्या अंगणात गेलोच नाही
नजरेला नजर भिडलीच नाही
नुस्तं ऐकलय, तिच्याबद्दल
मनात सुखद लहर दौडून गेली
मी सुखावलो नि
वेडा झालो.

तिचं रूप हसत आलं नि
मनात चिकटून गेलं
ओढून काढावं तर मनही निघून जाईल.

रोखलेल्या बंदुकांच्या पलिकडे
उभी आहे ती.
मी निशाना बनलोय समोर
रक्ताच्या धारेवर पोहत जायचंय तिथं

गालावरच्या थेंबावरही
बंदुका नेम धरतात
भुकेच्या जोरावर बंदुका धरणारे
भुकेवर गोळ्या झाडताहेत.

काळ इशारा करतोय;
बंदुका जाग्या होत आहेत

बंदुकांविरुद्ध बंदुकाच उठतील
तेव्हाच उगवतीला किरणं फुटतील
मी चाललोय तिला भेटायला
मी चाललोय तिला भेटायला.

भिलोरी

कविता

आणि

मराठी

अनुवाद

## तव्वय

' असे कज्यारं '
कोनी इचारना त
गालफट्टे लाल व्हई जात,
नहा त कचुरीमां कोंडी देत
ते काईबी करोत
एक शब्द नहा काड़ना जोयं, आपू –
तिस्नी विरुद्ध.
नहा पटं त, पाठ फिराई लेना जोयं
देखेल ता इसराई जाना जोयं
कदी खूब जीव्वर वनी त
गाव सोडीन निंगी जाना जोयं
गुपचूप
कायबी सहन करवा
तव्वय आमिना जमाना
आवल आखं
गरीबस्ला ...!

## तेव्हा...

' असं हे का बुवा ! '
कोणी विचारलं तर
गालफडं लाल होऊन जातात.
नाही तर जेलात पाठवून कोंडून देतात.
ते काहीही करोत
एक शब्द उच्चारता कामा नये आपण
त्यांच्याविरुद्ध.
नसेल पटत तर, पाठ फिरवून घ्यायला हवी
बघितलं असेल ते विसरून जायला हवं
जर जिवावर आलंच तर
गाव सोडून निघून जायला हवं
गुपचूप
काहीही सहन करावं,
तेव्हा आताचा जमाना
चांगलं म्हणतो
गरिबांना ...

## चिलम

चिल्लमना दुखला
वादया गम सोडीन
हातपाय हालवणारा
भुरव्या जीव
कावूक लुगून
टक लाईन
देखता न्हय, चिल्लमना दुखला गम
निराश व्हईन
अनं
दुसरा झुरका सोडं
जस्या तिना अईच काम स
जानू काय !

# चिलीम

चिलमीचा धूर
आकाशाकडे सोडून
हातपाय हलवणारा
भुका जीव
कितीतरी वेळ
सारखा
बघत राहतो, चिलमीच्या धुराकडे
निराश होऊन
आणि
दुसरा झुरका सोडतो
जसं त्याचं हेच काम आहे
जणू काय !

## खावटी

‘ आठ्याभर व्हई त येवा ’
मी शेरभर सांगनील ... मंग
ढेड आठवर वनी, पन
पाटील आयकना न्हा.’
गिनू आखनी तव्वय सुमन
‘ रिकाम्याबी त कतलाक दिन बठसूत य ?
हामनी कालदिस्नी खावटी न्हा
आठ्या–बिट्यानीच राबडी-बीबडी
करीन पी लेसूत
पेटला आधार !’
सुमन कामनी तयारी देखाडनी
पन गिनू आखनी
‘ अय पन ... पाटील त जाता न्हना
...सेवादं....!’

## खावटी (धान्य)

' आठ्याभर असेल तर या '
मी शेरभर सांगितलं.... नंतर
दीड आठ्यावर आले, पण
पाटलांनी ऐकलं नाही '
गिनू म्हणाली. तेव्हा सुमन–
' रिकाम्या पण किती दिवस बसणार ग ?
आमची कालपासून खावटी नाही
आठ्याबिठ्यांचीच कांजी-बिंजी
करून पिऊन घेणार
तेवढाच पोटाला आधार !'
सुमनने कामाची तयारी दाखवली
पण गिनू म्हणाली,
' अगं पण,.... पाटील तर निघून गेला
..... शहाद्याला...!'

---

आठ्या = अर्धा किलोचे माप
खावटी = धान्य

## दुःख

'अयं मना पाय चेपी दे न जराक'
कन्हारता जाईन–
तो तीनी घरवालीला आखं
'घर झाडाना, पाणी भराना न्हवू देवू ?'
कटाईन बायको उत्तर देनी
'अय, ताबी करजी नं.., पन...'
गुचकाय गया, ततईन ठावकाच न्हना.
बायको नावरास्ला समजावती न्हनी;
अथीच पाय चेपती बठू !
दुःखला धरीन बठसून त
खासूत काय ?
बठ्ठं मान्स कामला निंगीन
वाटं लागी गय सत
आजून घरमाना पसारा
तशाच पडना स...'
आयकता न्हना....
नावरास बायको गम घडी भर
मिटी-मिटी देखता न्हना अन्
डोका लुगू फाटकेल गोधडं
फंगरीन तो निजी गया.

## दुःख

‘ अगं, माझे पाय चेपून दे नं जरा.’
कण्हत
तो त्याच्या बायकोला म्हणाला.
‘ केर काढणं, पाणी भरणं राहू देऊ ?’
कंटाळून बायकोनं उत्तर दिलं.
‘ अगं, तेही कर नं... पण....’
हुंदका आला, गहिवरला आणि गपचूप राहिला.
बायको नवऱ्याला समजावत राहते;
इथेच पाय चेपत बसू !
दुःखाला धरून बसलो तर
खाणार काय ?
सर्व माणसं कामाला निघून
रस्त्याला लागलेली आहेत
अजून घरातला पसारा
तसाच पडलेला आहे...’
ऐकत राहतो...
नवरा बायकोकडे घडीभर
टकमक बघत राहतो आणि
डोक्यापर्यंत फाटकी गोधडी
ओढून तो झोपून जातो.

## चांद गिन्हन

‘ तो देख गिन्हन ’
बाप बेटाला सांग
तव्वय बेटा – ‘ गिन्हन ?
बापऽऽरे...!
बहुाच गिई चालना
चांदबाबाला
तो राखोस
न बाबा, कज्या ततयत बठं मान्सं
तो बी आपनी गिन्हावर
ततयता व्हई ?
– ती दिन आपू
भूखेच निजनलत
तव्वय तो खूब
ततयना व्हई, न बाबा !’

## चंद्रग्रहण

' ते बघ ग्रहण '
बाप बेटयाला सांगतो
तेव्हा बेटा – ' ग्रहण ?
बापऽऽरे... !
सर्वच गिळून जात आहे
चांदोबाला
तो राक्षस.
ना बाबा, का हैराण होतात सर्व माणसं
तो पण आपल्या ग्रहणावर
हैराण होत असेल ?
– त्या दिवशी आपण
उपाशीच झोपलो,
तेव्हा तो खूपच
हैराण झाला असेल, नं बाबा ?'

## चड्डी

' आतली वार रं !
कवयस्नी घंट्टी वाजी गईस्नं
बठ्ठं पोरे येई लागनं सत शायमां
गुरुजी व्हाराला धाडना स मला
चाल जल्दी !' – किसू आखना
तव्वय दिलप्या –
' येवू रं, हागाला गयला तिमा
वार लागी गई
जब्बर काम जिवां आथल्यात भो
मनी चड्डीमां
हागता-हागता बट्टुचा मारी टाकना
तरुक लिखा न् पिखलं ऱ्हईच गयत अन्
चड्डी बी बट्टी
किट्टा
यली
फाटली
लिखा अन् पिखलं
फेकी देवाना इचार फिरी गयला पन्
पव्वाला दुसरी चड्डी नाहा मिय न !'

## चड्डी

' इतका उशीर रे !
केव्हाची घंटी वाजून चुकली आहे.
सर्व पोरं केव्हाची आलीत शाळेत.
गुरुजींनी बोलवायला पाठवलंय मला
चल लवकर ! ' किसू म्हणाला.
तेव्हा दिलप्या –
' येतो रे ! हगायला गेलो होतो म्हणून
उशीर झाला
भयंऽऽकर उवा होत्या गड्या
माझ्या चड्डीत
हगत-हगत सर्व मारून टाकल्या
तरी अंडी आणि बारीक पिल्लं राहूनच गेली आणि
चड्डी ही सर्व
मळ-
लेली
फाटकी.
अंडी आणि बारीक पिल्लं.
फेकून द्यायचा विचार मनात येऊन गेला – होता पण
घालायला दुसरी चड्डी नाही ना !'

## बायतीन बाई

मायनी ताआ लेक
बायतीन व्हईन आज सातवा दिन
पय्यल बी एक निरोप गयला
अन कालदीन बी त मोग्या जाई वुना पन
तिना घरवालाना आजून पत्ता नाहा
पैशा नाहा देता व्हई तिना पाटील.
काय करी बिचारा
दूसराना गुलाम तो.
पोऱ्यागम देखीन
मनमाच खाव्वाय ती
अन आसवं पूसं
काईच नाहा मिय माय खावाला
आज ती बी कामला येवाव आखी.

## बाळंतीण बाई

माहेरी लेक
बाळंतीण होऊन आज सातवा दिवस
अगोदर पण एक निरोप गेला होता
आणि काल पण मोग्या जाऊन आला. पण
तिच्या नवऱ्याचा अजून पत्ता नाही.
पैसे देत नसेल त्याचा मालक
काय करणार बिचारा
दुसऱ्याचा गुलाम तो.
बाळाकडं बघून
मनातल्या मनात रडते ती
आणि अश्रू पुसते,
'अगं, काहीच नाही गं खायला
आज ती पण कामाला येणार आहे.'

## कुंदानी पेढी

कुंदानी पेढी खोदता-खोदता
दिन फिरी गया
आजून भाकरना पत्ता नाहा
खोदता-खोदता...
हाडक्कं गयत मसानमां
बिलासभर पेटनी करता

## कुंदाचं खळ

कुंदाचं खळ खणता-खणता
दिवस ढळून गेला
अजून भाकरीचा पत्ता नाही
खणता-खणता
हाडं गेली मसणात
वितभर पोटासाठी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

---

कुंदा = एक प्रकारचं गवत

## गांडं मान्सस्नी गांडी बात

कोनी पादी ततलामाच
सट्टान व्हई जात
न्हात मंग
हागाडी-हागाडी लेत
असे यें गांडं मान्स
आमी आखू बठत –
' आजून व्हई काय गया स
आजून गंज मुलूख लेवाना स
थेट पुरसूत
लाठी हल्लामां
हुशार व्हनत अन व्हसूत
राज–रंगना ईशारा
हामून आमी समजी गय्य सत
मांडव चिबता चिबता
कदी
गोईबार कां न्हा व्हई जाय पन
मांडव त चिबसूतच.

## वेडी माणसांची वेडी गोष्ट

कोणी पादला तेवढ्यात
सैरा वैरा पळतात
नाही तर मग,
हगवून हगवून घेतात
अशी ही वेडी माणसं
आता म्हणू लागली –
‘अजून झालं तरी काय
अजून गंज मुलुख ओलांडायचा आहे
थेटपर्यंत पुरणार,
लाठीहल्ल्यात
हुशार झालोत आणि होणार
राजरंगचा इशारा
आम्ही आता समजून गेलो आहोत
मंडप चिबता चिबता *
जर
गोळीबार का होईना, पण
मंडप तर चिबणारच.’

---

* चिबता = आदिवासी भिल्ल समाजात लग्नाच्यावेळी नवरा मुलगा हळद लावून नवरीच्या गावाला नवरी जिंकण्यासाठी जातो. त्या वेळेस नवरा मुला कडचा निरोप्या (खिच्या) नवऱ्या मुलीच्या लग्नाच्या मंडपाला दिवस अस्त होण्यापूर्वी काही झालं तरी – स्पर्श ( चिबण ) करायलाच पाहिजे, नाही तर लग्न होऊच शकत नाही. मंडपाला स्पर्श करण्याच्या वेळी नवरीकडच्या मुली मंडपाला घेरून उभ्या असतात. निरोप्या आला तर त्याच्यावर तुटून पडतात. त्याला दूर ढकलतात. कपडे फाडून टाकतात. बदडूनसुद्धा काढतात. खूप खिजवतात. पण तरीदेखील निरोप्याला मंडपाला कसेही करून स्पर्श करावाच लागतो.

## फुगेलं जनावरं

' रगत पीईन फुगेलं जनावरं
' दगड ' ला
सेंदूर लावीन देव करत
नत गांड पुसीन
फेकी देत.
तिमां, दगड बनीन
गांडमां घूसीन
तिस्ना गुं पुसाना इसरा
दिन बाका सत.'

## फुगलेली जनावरं

' रक्त पिऊन फुगलेली जनावरं
दगडाला सेंदूर लावून देव करतात
नाही तर ढुंगण पुसून
फेकून देतात
म्हणून दगड बनून
ढुंगणात घुसून
त्यांचे गू पुसायचे विसरा
दिवस कठीण आहेत...'

## पोरेस्नी बादी

पोरे चुला भवती गर्दी करतं
पुऱ्यास्ला देखीन सडसड करतं
माय पोरेस्ला डोकाडं
‘दम धरा ऽ रं,
धीर बीर स क नाहा ?
देव बाबा करा शिवाय
टोपलीला हात लावाना नाहा.
आज सन स.’
माय सांग करीन आयकवा
अतलाच पोरेस्ला मालूम.
पोरे घाबराई-घाबराईन
देव बाबा करनत अन
बका बका
थोडाच टाईममां जास्ती खावाना
जानू काय बादी पडी गई.

## मुलांची स्पर्धा

मुलं चुलीभवती गर्दी करतात
पुरणाच्या पोळ्या बघून चुळबूळ करतात
आई मुलांवर ओरडते
‘ दम धरा ना,
धीर बीर आहे की नाही ?
देवपूजा केल्याशिवाय
टोपलीला हात लावायचा नाही.
आज सण आहे.’
आई म्हणते म्हणून ऐकावं
एवढंच मुलांना माहित.
मुलं घाईघाईत
देवाच्यां पाया पडली अन्
बकाबका
थोड्याच वेळात जास्त खायची
जणू काय स्पर्धा सुरू झाली,

## ढयडा-ढयडीस्नी चिंता

' कसे ऽऽ रे तू,
दिनं दिनं सुकाय न्हनास. काय दुःख रं ?'
आपू इचारवात
' ही ही ' करीन हासी लेय अन
' काय नाहा वं ' करीन
निस्टिन न्हासी पड.
बराबरीनं पोरे
पोरे सोरे वालं व्हई गयं सत.
साती बरोबर आंडोर
देखीन त साती दाबाय
डोयामां शरम येयं ...'
ढयडी ढयडानी म्होरं परेड लावं,
ढयडा कान दिईन आयकता न्हय.
कांहीच बोलता नाहा.
ढयडी थोडी शांत;
अन आखू ढयडानी म्होरं कूर कूर करं
' चेहरावर नूर नाहा
मनमाच सोच कर क काय, कोन जान.'
ढयडा किदराईन–
' पोऱ्या न्हना दूर
पय्यलं तूच सोच करी ले.
कटकट लावनी स अथी'
ढयडी थोडी खवयनी–
' अरं, पोऱ्या काय सांगी क,
' मला बायको करी देवा '
ती बात त
समजदारला समजना जोयं'

ढयडानी बी थोडी डोकी फिरनी
' हो ऽऽ वं. समजना जोयं
तूनी बात बी खरी स. पन,
हात मूठमां व्हईत्त मानूस
काय बी कर.
लगीन कराला आज काय लाग ?
थोडामां थोडाच करनत तरुक बी
कार वालाना डोया निंगी पडत
या बाता नूस्त्या चावयान्या नाहा मियत.
तयडा सूं सूं करं
तव्वय ढयडी थोडी नरमाईन–
' तूला त कायजीच नाहा
चडती जिवानी
कोना काय सांगता येयं
भ ऽऽ ड़ करीन
किभाग आंग टाकी देना त मंग ?
ढयडा : मंग काय, व्हई जस्या व्हई तस्या...

चांदणी टिपूर रात
भाकरनी टोपली वचमां
ढयडा–ढयडी वागूल करत
बठनलत्त वटापं.

## म्हातारा म्हातारीची चिंता :

‘ कसा ऽ रे तू
दिवसेन् दिवस वाळतो आहेस, काय दुःखतं रे ?
आपण विचारावं तर
‘ ही ही ’ करून हसून देतो आणि
‘ काय नाही गं ’ म्हणत
निस्टून पळून जातो,
‘ बरोबरीची पोरं
पोरंसोरंवाली झालीत.
छातीबरोबर मुलगा
बघून तर छाती दबते.
डोळ्यात शरम येते...’
म्हातारी म्हाताऱ्यापुढे किरकिरते
म्हातारा कान देऊन ऐकत राहतो.
काहीच बोलत नाही
म्हातारी थोडी शांत
अन पुनः म्हाताऱ्यापुढे कुरकूर करते.
‘ चेहऱ्यावर तेज नाही
मनातच खचतो की काय, कोण जाणे ’
म्हातारा वैतागून –
‘ पोरगा राहिला दूर
आगोदर तूच खचून जा
कटकट लावली आहे इथं ’
म्हातारी थोडी खवळली –
‘ अरे, मुलगा काय सांगेल की,
मला बायको करून द्या.
ती गोष्ट तर
समझदाराला समजायला हवी’

म्हाताऱ्याची पण थोडी खोपडी फिरली.
‘ होय, समजायला पाहिजे
तुझी गोष्ट खरी आहे पन्
हातामुठात असेल तर माणूस
काहीतरी करतो
लग्न करायला आज काय लागतं ?
थोडच्यातल्या थोडच्यात केलं तरी पण
कारवाल्यांचे डोळे पांढरे होंतात
या बाता नुस्त्या गप्पा मारायच्या नसतात. ’
म्हातारा फुस्कारतो.
तेव्हा म्हातारी नरमाईने–
‘ तुला तर काळजीच नाही
चढती जवानी
कोणाचं काय सांगता येतं
भ ऽऽ ड करून
कुठही आंग टाकून दिलं मग ? ’
म्हातारा : ‘मग काय, होईल जसे, होईल तसे ... ’

चांदणी टिपूर रात्र
भाकरीची टोपली मधे
म्हातारी म्हातारा रवंथ करत
बसले होते ओटच्यावर.

---

• कारवाले = ( लग्न ) कार्य करणारे.

आदिवासी समाजात लग्न ठरवतात तेव्हा मुलाच्या वडिलांकडून मुलीच्या वडिलांना पैसे द्यावे लागत. म्हणून म्हातारा–म्हातारीला लागलेली चिंता.

## सुकल्यानी भाकर

पोरे आंगणमां रव्वत
नाऱ्यानी हातमा भाकर
चिडानी गत टोची खाय
सुकल्या तिनीगम देखताच ऱ्हय.
सुकल्या देखी देखी भाग न
घरमा दौडीच जाय.
: ' मां भाकर दे ऽ ऽ वं '
: काय नाहा बेटा, रांधनी नाहा
: मंग रांध त ऽऽ वं, भूख लागनी सन !
सकायला बी कायना रांधनी
नाऱ्यानी माय त नाऱ्याला
भाकर रांधी देनी
तू कज्या नाहा रांधी देती ऽऽ न ऽऽ मां !'
सांगता सांगता सुकल्या रडी देना
सुकल्यानी माय
सुकल्याला आगडीमा तानी लेनी
काय नाहा बेटा,
खावटी नाहा मिय
कालदीन तूना बाबा
दाना लिवी त मंग
पहिली भाकर तुलाच देसू, हां !'
माय, सुकल्याला समजाडती ऱ्हनी
सुकल्या भाकर-भाकर करीन
कावूक लुगून रि-रि करता ऱ्हना अन
मायनी मांडीप डोकां थोवीन सुकल्या
निजी गया.
सुकल्यानी भाकर गई काहा ?

## सुकल्याची भाकर

मुलं अंगणात खेळतात
नाऱ्याच्या हातात भाकर
पक्षी सारखा टोचून खातो
सुकल्या त्याच्याकडे बघतच राहतो.
सुकल्या पाहतो पाहतो नी
घरात धावून जातो
: आई, भाकर दे गं
: काय नाही बाळा, रांधले नाही'
: मग रांधना गं, भूक लागली आहे ना !
सकाळी पण रांधलं नाही
नाऱ्याच्या आईनं नाऱ्याला
भाकर रांधून दिली
तू का रांधून देत नाही, आई !'
सांगत सांगत सुकल्या रडू लागला
सुकल्याची आई
सुकल्याला कुशित ओढून घेते
काय नाही बाळ,
खावटी नाही आहे,
उद्या तुझे बाबा
धान्य आणेल मग
पहिली भाकर तुलाच देऊ हं !'
आई सुकल्याला समजवत राहते.
सुकल्या भाकर भाकर करून
बराच वेळ रि रि करत राहिला नि
आईच्या मांडीवर डोकं ठेवून सुकल्या
झोपून गेला.
सुकल्याची भाकर गेली कुठं ?

## नेरब्यांना संसार

नेरब्याना दिन या अस्या
बठवा त हात टेकीनच
उठवा त हात टेकीनच
नेरब्याला आव्व नाहा ऱ्हनी]
हातपं लिवाना पानपं खावाना
' भूरव्या संसार, 'मानूस' खाय–
देखाय नाहा न् दुःखाय नाहा.'

## नेरब्याचा संसार

नेरब्याचे दिवस हे असे,
बसावं तर हात टेकूनच
उठावं तर हात टेकूनच
नेरब्याला आव[☆] राहिली नाही.
हातावर आणावे पानात खावे.
' भुकेला संसार 'माणूस' खातो
दिसत नाही न् दुखतही नाही '

---

☆ आव = ( आर्थिक ) क्षमता

## मां पहिली लढाई आपनीच

काबूक लूगू मनी बाजू धरसी, मां !
बाबा गाया देय अन् तू जीव तोड
नाता तोडी टाक मां, नाता तोडी टाक

मां, मला पोलिस मारी टाकीत
करीन तू भिवी गई ?
मला बंदुकच मारी;
अशी बात नाहा मिय, मां !
जीव लेनारं चौफेर सत.
घरमां-बाहेर, सगा-साई, माय-बाप
बठस्मां पानी मूरायल स, अन्
ते तसेच बोलत. तव्वय ते बी
मला जीव लेनारच देखात.
मरननी नेटमां कतलाक दपता फिरू ?
जीव स तावूक
मानूस्कीनी लढाई लढनाच पडी.

बाहेरनी दुन्या आव्वल नाहा
जीव भिवू लागला त मंग,
नं, मां ! मला कज्या जन्म देनी
पोटमांच ली फिरती त ?

मां, अय दुन्या आवल नाहा मियं
तूना डोयामां बी पानी
मना डोयामां बी पानी
तूना जीव ततय्
मना जीव ततय्
मां, तूना जीव घरमां खेचं अन्
मना जीव बाहेर खेचं
मां पयली लढाई आपनीच.

## आई, पहिली लढाई आपलीच

कुठं पर्यंत माझी बाजू घेशील आई !
बाप शिव्या देतो अन् तू जीव तोडतेस
नातं तोडून टाक आई, नातं तोडून टाक

आई, मला पोलीस मारून टाकतील
म्हणून तू भ्यालीस ?
मला बंदुकच मारेल
अशातली गोष्ट नाही, आई !
जीव घेणारे चौफेर आहेत.
घरात-बाहेर, सगे-सोयरे, माय-बाप
सर्वात पाणी मुरलेलं आहे आणि
ते तसेच बोलतात, तेव्हा ते पण
मला जीव घेणारेच दिसतात.
मरणाच्या धाकाने किती दिवस लपत फिरू ?
जीव असेपर्यंत
माणुसकीची लढाई लढवावीच लागेल.

बाहेरची दुनिया चांगली नाही
जीव भित होता तर मग,
आई ! मला का जन्म दिलास
पोटातच घेऊन फिरली असतीस तर ?

आई, ही दुनिया चांगली नाही
तुझ्या डोळ्यातही पाणी
माझ्या डोळ्यातही पाणी
तुझा जीव दुखतो
माझा जीव दुखतो
आई, तुझा जीव घरात ओढतो आणि
माझा जीव बाहेर ओढतो
आई, पहिली लढाई आपलीच.

# एक भिलोरी गाणं

हामला आखत रं आखत आदिवासी
हामना संसारला दुरतीच् कूत्रं भूकत ।। धृ ।।
गोधडे देखवा हामनं झालरवालं
फाटीतूटीन आतडे बाहे ऽऽ रं
गोधडे फंगरवा त गोधडेस्मा चांदबाबा देखाय ।।१।।
खाटलं देखवा हामनं थाटूक माटुक
ढिल्या दोऱ्या तिस्ला सतरा गाठां
अरं, निजवा त धरतीला बुंद्या टेकाय ।।२।।
तेलन्या सिस्याबी आटाई गयात
खांबला टांगेल्या टांगाई ऱ्हन्यात
हांडीभरी रसारं, तेलना सितडा नाहा ।। ३ ।।
पानीना गोया दारमां मांडेला
चिंध्रस्ना बूचा पेटमां फुटेला
काट फुटेला, हाडगे पानी पेत ।। ४ ।।
पानी पेवाना पतरा भारी
बूंद्या चूंगर पानीनी धार
पानी पेवा त आर्धा मूयमा-भूयमा ।। ५ ।।
बांडी हांडी● अन् बांड्याच चाटू●
गुबडायल्या तबकड्या, तिस्ना बी तोटा
पोरे झूलात, तबकड्या नाऱ्या हेरत ।। ६ ।।
कूडनी झोपडीला गोंठस्ना ठिग्या
इभाकना हाडग्या तिभाग निंगी जाय
हामनी वस्तीला दूरतीच वैखी लेत ।। ७ ।।
हामना संसारला हामूच हासत
हासी हासीन कतलाक हासत
बदला बदलां रं, बदला दुनिया सारी ।। ८ ।।

## एक भिलोरी गाणं

आम्हाला म्हणतात म्हणतात आदिवासी
आमच्या संसाराला, दुरूनच कुत्री भूंकतात ।। धृ ।।
गोधडी बघावं आमची झालरवाली
फाटून तूटून आतडी बाहेर
गोधडी ओढावं तर गोधडीत चांदोबा दिसतोय ।। १ ।।
खाटली बघावं आमची थाटूक माटुक
ढिल्या दोऱ्या त्यांना सतरा गाठा
अरे, झोपावं तर जमीनीला ढुंगण टेकतेय ।। २ ।।
तेलाच्या बाटल्याही आटून गेल्यात
खांबाला टांगलेल्या टांगल्याच राहिल्यात
हांडी भरून रसा रं, तेलाचा थेंब नाही ।। ३ ।।
पाणीचा माठ दारात मांडलेलं
चिंद्याचं बूच पोटात फुटलेलं
काट फूटलेला, कावळे पाणी पितात ।। ४ ।।
पाणी प्यायचा ग्लास भारी
बुंद्यात छिद्र पाणीची धार
पाणी प्यावं तर, तोंडात अर्ध खाली ।। ५ ।।
थोटकी हांडी• अन् थोटयाच चाटू•
पेचाळलेली ताट, त्यांचाही तोटा
मुलं भांडतात, स्वतंत्र ताट बघतात ।। ६ ।।
कुडाची झोपडीला, पोत्याचं ठिगळ
इकडचा कावळा, तिकडे निघतो
आमची वस्तीला, दुरून ओळखून घेतात ।। ७ ।।
आमच्या संसाराला, आम्हीच हसतो
हसून हसून, कितीक हंसावं
बदला बदला रं, बदला दुनिया सारी ।। ८ ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

---

• हांडी = भाजी रांधायची मातीची भांडी
• चाटू = लाकडी चमच

❁ 卐 ❁

REFBK-0025324
REFBK-0025324